# महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)

मित्तल टॉवर– मुंबई ,नरीमन पॉईंट ,फ्री प्रेस जर्नल मार्ग ,तिसरा मजला ,ए विंग , ४०००२१

जावक क्रमांक : जावक क्रमांक :राअस/स्वमअ / सिटी कॉर्डीनेटर नियुक्ती /१०८/, दिनांक : ०७/०८/२०२०

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत "स्वच्छ सर्वेक्षण-२०२१" साठी शहरांच्या कामाची प्रगती केंद्र शासनाच्या संकेत स्थळावरील एम.आय.एस. वर संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस दरमहा नोंदवावी लागणार आहे. तसेच, जी.एफ.सी. व ओ.डी.एफ. + / ++ या घटकाअंतर्गत प्रत्येक शहरांनी आपली तयारी विहित कालावधीत पूर्ण करावयाची आहे. या कामांसाठी प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावर एक "शहर समन्वयक" (City Coordinator) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यासाठी योग्य उमेदवार निवड करून त्यांची शिफारस संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना करावयाची आहे.

यास्तव, राज्यातील सर्व नागरी स्थानिकस्वराज्य संस्थांमध्ये "शहर समन्वयक" (City Coordinator) ची निव्वळ कंत्राटी पध्दतीने संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थे मार्फत तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्या करीता खालील पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत :-

| पदनाम | जागा | शैक्षणिक अर्हता | अर्ज कोणाकडे करावा | अनुभव | ठोक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| "शहर समन्वयक" (City Coordinator) | ३९५ (पदांची संख्या कमी होऊ शकते | मान्यताप्राप्त विद्यापीठातील खालील पैकी कोणतीही पदवी :<br>अ) बी.ई. (कोणतीही शाखा)<br>ब) बी. टेक. (कोणतीही शखा)<br>क) बी आर्क.<br>ड) बी.प्लॅनिंग<br>ई) बी.एस.सी.(कोणतीही शाखा) | उमेदवारांनी http://smmurban.com या वेबसाईट वरील लिंकवर ऑन लाईन अर्ज करावा. (इतर कोणत्याही माध्यमाने अर्ज स्विकारले जाणार नाहीत.) | नागरी क्षेत्रातील कामाचा किमान ६ (सहा) महिन्यांचा अनुभव आवश्यक. | १)अमृत शहरे व गडचिरोली जिल्हातील शहरां करीता रु. ३५,०००/- प्रति माह मानधन.<br>(# अमृत शहरांची यादी संकेत स्थळावर उपलब्ध आहे)<br>२) उर्वरीत शहराकरीता रु.३०,०००/- प्रति माह |

**(अ) अपेक्षित कामाचे स्वरूप :**

**उमेदवाराची नियुक्ती होईल त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या खालील विषयांची अनुषांगीक कामे:**

**१) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६, च्या संबंधित अनुषंगीक कामे.**
**२) स्वच्छ सर्वेक्षण २०२१ संबंधित अनुषंगीक कामे.**
**३) हागणदारी मुक्त शहरासंबंधीची कामे (ODF, ODF+/++, Water +) संबंधित अनुषंगीक कामे.**
**४) कचरा मुक्त शहरांच्या तारांकीत मानांकना संबंधित अनुषंगीक कामे.**
**५) मुख्याधिकारी यांनी नेमून दिलेली स्वच्छता विभागातील इतर संबंधित आनुषांगिक कामे.**

**(ब) उमेदवारांसाठी सुचना :**

**१) कंत्राटी तत्वावरील सदर नियुक्तीसाठी केवळ ऑनलाईनच अर्ज करावयाचा आहे. एका उमेदवाराने एकच अर्ज करावयाचा आहे. एकापेक्षा अधिक अर्ज केल्याचे निदर्शनास आल्यास ते सर्व अर्ज बाद ठरविण्यात येतील.**
**२) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करण्या करीता http://smmurban.com या संकेतस्थळावरील लिंकचा वापर करावा.**
**३) ऑनलाईन अर्ज करण्याचा शेवटाचा दिनांक बुधवार १९ ऑगष्ट, २०२० असा आहे.**

४) अर्जात उमेदवारास आपल्या पंसतीचा महसूली विभाग नमूद करावयाचा आहे.
५) प्रथम पसंतीच्या महसूली विभागात संबंधित उमेदवारास ऑनलाईन मुलाखत द्यावी लागेल.
६) कंत्राटी तत्वावरील सदर नियुक्तीसाठी महसूली विभागात संबंधित विभागीय प्रादेशिक उपसंचालक यांच्या अंतर्गत निवड समिती मार्फत ऑनलाईन मुलाखत (Video Conferance) घेतली जाईल . ऑनलाईन मुलाखतीचा वेळ, दिनांक व लिंक आपणास स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.
७) या प्रकियेव्दारे निवड झालेल्या पात्र उमेदवारांची कंत्राटी तत्वावर नियुक्तीसाठी संबंधित नागरी स्थानिक संस्थेकडे विभागीय प्रादेशिक उप संचालक यांचे मार्फत शिफारस करण्यात येईल.
८) सदर शिफारशी नुसार संबंधित नागरी संस्थे मार्फत संबंधित उमेदवारास कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.
९) संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थे मार्फत नियुक्ती पत्र मिळाल्यावर उमेदवारास विना विलंब, तात्काळ नियुक्ती दिलेल्या शहरात रूजु व्हावे लागेल.
१०) नियुक्तीच्या ठिकाणात बदल करण्यात येणार नाही.
११) शहरांची संख्या व आवश्यक पद संख्येत बदल होऊ शकतो.

(क) अटी व शर्ती :

१) कंत्राटी तत्वारील सदर नियुक्ती "स्वच्छ सर्वेक्षण-२०२१" अंतर्गत सर्व तपासण्या पुर्ण होइपर्यंत राहील.
२) नियुक्ती कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. तसेच, या नियुक्ती स्थायित्व देण्यात येणार नाही.
३) कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या सदर कर्मचाऱ्यांस शासकीय कर्मचाऱ्यांस मिळणाऱ्या कोणत्याही सोई सुविधांचा लाभ मिळणार नाही. / अनुज्ञेय असणार नाही.
४) सदर नियुक्ती ही पूर्णतः कंत्राटी मानधन तत्वावर आहे.
५) सदर मानधन संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थे मार्फत अदा करण्यात येईल.
६) उमेदवाराचे वय दि. १ ऑगस्ट २०२० रोजी ३५ वर्षा पेक्षा अधिक नसावे.
७) नागरी क्षेत्रातील कामाचा किमान ६ (सहा) महिन्यांचा अनुभव आवश्यक.
८) सदर अटी, शर्ती व नियुक्ती प्रक्रियेत बदल करण्याचे तथा रद्द करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय यांनी राखून ठेवलेले आहेत.

( स्वाक्षरी )
राज्य अभियान संचालक
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)

## अमृत शहरांची नावे

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | शहराचे नाव | शहराचा वर्गवारी |
|---|---|---|---|---|
| १. | अमरावती | यवतमाळ | यवतमाळ | अ वर्ग |
| २. | अमरावती | अमरावती | अमरावती | महानगरपालिका |
| ३. | अमरावती | अकोला | अकोला | महानगरपालिका |
| ४. | अमरावती | अमरावती | अचलपुर | अ वर्ग |
| ५. | औरंगाबाद | परभणी | परभणी | महानगरपालिका |
| ६. | औरंगाबाद | नांदेड | नांदेड | महानगरपालिका |
| ७. | औरंगाबाद | लातुर | लातुर | महानगरपालिका |
| ८. | औरंगाबाद | बिड | बिड | अ वर्ग |
| ९. | औरंगाबाद | उस्मानाबाद | उस्मानाबाद | अ वर्ग |
| १०. | औरंगाबाद | जालना | जालना | अ वर्ग |
| ११. | औरंगाबाद | लातुर | उदगीर | अ वर्ग |
| १२. | औरंगाबाद | औरंगाबाद | औरंगाबाद | महानगरपालिका |
| १३. | कोंकण | रायगड | पनवेल | महानगरपालिका |
| १४. | कोंकण | ठाणे | नवि मुंबई | महानगरपालिका |
| १५. | कोंकण | ठाणे | बदलापुर | अ वर्ग |
| १६. | कोंकण | ठाणे | अंबरनाथ | अ वर्ग |
| १७. | कोंकण | मुंबई | ब्रुहन्मुंबई | महानगरपालिका |
| १८. | कोंकण | ठाणे | मिराभायंदर | महानगरपालिका |
| १९. | कोंकण | ठाणे | ठाणे | महानगरपालिका |
| २०. | कोंकण | ठाणे | वसई विरार | महानगरपालिका |
| २१. | कोंकण | ठाणे | उल्हासनगर | महानगरपालिका |
| २२. | कोंकण | ठाणे | कल्याण | महानगरपालिका |
| २३. | कोंकण | ठाणे | भिवंडी | महानगरपालिका |
| २४. | नागपुर | चंद्रपुर | चंद्रपुर | महानगरपालिका |
| २५. | नागपुर | वर्धा | वर्धा | अ वर्ग |
| २६. | नागपुर | गोंदिया | गोंदिया | अ वर्ग |
| २७. | नागपुर | वर्धा | हिंगनघाट | अ वर्ग |
| २८. | नागपुर | नागपुर | नागपुर | महानगरपालिका |
| २९. | नाशिक | जळगाव | भुसावळ | अ वर्ग |
| ३०. | नाशिक | नाशिक | नाशिक | महानगरपालिका |
| ३१. | नाशिक | धुळे | धुळे | महानगरपालिका |
| ३२. | नाशिक | नाशिक | मालेगाव | महानगरपालिका |
| ३३. | नाशिक | नंदुरबार | नंदुरबार | अ वर्ग |
| ३४. | नाशिक | अहमदनगर | अहमदनगर | महानगरपालिका |
| ३५. | नाशिक | जळगाव | जळगाव | महानगरपालिका |
| ३६. | पुणे | सातारा | सातारा | अ वर्ग |
| ३७. | पुणे | पुणे | पिंपरी चिंचवड | महानगरपालिका |
| ३८. | पुणे | पुणे | पुणे | महानगरपालिका |
| ३९. | पुणे | सोलापुर | सोलापुर | महानगरपालिका |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४०. | पुणे | सोलापुर | बार्शी | अ वर्ग |
| ४१. | पुणे | कोल्हापुर | इचलकरंजी | अ वर्ग |
| ४२. | पुणे | कोल्हापुर | कोल्हापुर | महानगरपालिका |
| ४३. | पुणे | सांगली | सांगली मिरज कुपवाड | महानगरपालिका |